# पंतप्रधानांच्या हस्ते भाजपाचं 'संकल्प पत्र' जाहीर; 'या' दोन मोठ्या घोषणांसह अनेक आश्वासनं



**नवी दिल्ली :** भारतीय जनता पार्टी (भाजपा) नं २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केलाय. केंद्रात सरकार स्थापन केल्यानंतर संपूर्ण देशात समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करेल, ही मोठी घोषणा भाजपानं केलीय. जाहीरनामा प्रसिद्ध करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, पक्षाचं 'संकल्प पत्र' विकसित भारताच्या चार मजबूत स्तंभांना तरुण, महिला, गरीब आणि शेतकरी सक्षम करेल.

वन नेशन वन इलेक्शनची अंमलबजावणी : भाजपानं आपल्या जाहीरनाम्यात म्हटलंय की, ''निवडणुकीशी संबंधित मुद्द्यांची तपासणी करण्यासाठी आम्ही एक उच्चस्तरीय समिती स्थापन केलीय. आता आम्ही त्यांच्या शिफारशींच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी काम करु.'' यासोबतच सर्व स्तरातील निवडणुकांमध्ये सामायिक मतदार यादीची तरतूदही ठेवण्यात येणार आहे.

भाजपाच्या जाहीरनाम्यात आणखी काय? : भाजपानं जाहीरनाम्यात ५० हजार रुपयांची कर्जमर्यादा वाढवून ती देशातील खेड्यापाड्यात आणि शहरांपर्यंत वाढवली जाईल, असं आश्वासन भाजपाच्या ठराव पत्रात देण्यात आलं होतं. तसंच ७० वर्षांवरील वृद्धांना आयुष्मान योजनेच्या कक्षेत आणून मोफत उपचाराची सुविधा मिळणार आहे. आणखी तीन कोटी घरे बांधण्याचा ठराव घेण्याचं आश्वासनही जाहीरनाम्यात देण्यात आलंय. त्याचबरोबर आता स्वस्त स्वयंपाकाचा गॅस प्रत्येक घरात पाईपद्वारे पोहोचवला जाणार आहे.

गरिबांसाठी काय : भाजपाच्या जाहीरनाम्यात म्हटलंय की, ''आम्ही २०२० पासून ८० कोटींहून अधिक कुटुंबांना मोफत रेशन देत आहोत. पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत पुढील पाच वर्षे मोफत रेशन सुरु राहणार आहे. यासोबतच गरिबांचं ताटही सुरक्षित ठेवण्याचे प्रयत्न सुरु राहणार आहेत. गरिबांच्या आरोग्य सुविधा लक्षात घेऊन कुटुंबांना ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिलं जात होतं आणि भविष्यातही असेच सुरु राहणार आहेत. पंतप्रधान आवास योजनेचा विस्तार केला जाईल.

वीज बिल शून्यावर आणण्याचं आश्वासन : आता भाजपानंही कोट्यवधी कुटुंबांची वीजबिल शून्यावर आणण्यासाठी काम करण्याचं आश्वासन दिलंय. ज्या अंतर्गत पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेवर वेगानं काम केलं जाईल, घरात वीज मोफत असेल आणि अतिरिक्त वीज विकून कमाई देखील केली जाईल. याशिवाय ट्रान्सजेंडर्सनाही आयुष्मान योजनेशी जोडलं जाणार असून आगामी पाच वर्षे महिला शक्तीच्या नव्या सहभागाची असतील.

मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी काय : भाजपाच्या जाहीरनाम्यानुसार मध्यमवर्गीय कुटुंबांना कमी किमतीची घरं, सुलभ आरोग्य सुविधा, चांगलं शिक्षण आणि रोजगार तसंच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातील. तसंच, ज्यांना स्वत:चं घर घेण्याचं स्वप्न आहे, त्यांच्यासाठी नोंदणीची किंमत कमी होईल, बांधकामाचा खर्च कमी होईल आणि नकाशा सहज पास होईल.

महिलांसाठी काय : येत्या ५ वर्षांत तीन कोटी ग्रामीण महिलांना लखपती दीदी बनवण्याचं आश्वासन भाजपानं आपल्या जाहीरनाम्यात दिलंय. औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील नोकरदार महिलांसाठी वसतिगृहं बांधली जातील ज्यात मूलभूत सुविधा असतील. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये नारी वंदन कायदा लागू करुन महिलांचं प्रतिनिधित्व सुनिश्चित केलं जाईल.

तरुणांना संधी देण्याची हमी : भाजपाच्या जाहीरनाम्यात तरुणांना संधी देण्याचं आश्वासनही दिलंय. जाहीरनाम्यानुसार, पेपरफुटीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा लागू करण्यात येणार असून, त्यात गुन्हेगारांवर कठोर शिक्षेची तरतूद असेल. तसंच सरकारी परीक्षांमध्ये पारदर्शकता आणली जाईल.

बुलेट ट्रेनची भेट : पंतप्रधान मोदी म्हणाले, ''आज अहमदाबाद मुंबई बुलेट ट्रेनचं काम जोरात सुरु आहे आणि ते जवळपास शेवटच्या टप्प्यात आहे. त्याचप्रमाणे एक बुलेट ट्रेन उत्तर भारतात, एक बुलेट ट्रेन दक्षिण भारतात आणि एक बुलेट ट्रेन पूर्व भारतात धावेल. यासाठी सर्वेक्षणाचं कामही लवकरच सुरु करण्यात येणार आहे. ६ज च्या माध्यमातून डिजिटल क्रांती आणणार : या जाहीरनाम्यात भाजपानं ५ज नेटवर्कचा विस्तार आणि ६ज तंत्रज्ञान विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याचं आश्वासन दिलंय. तसंच, भारत नेटद्वारे २ लाखांहून अधिक ग्रामपंचायती ब्रॉडबँडशी जोडल्या जातील आणि प्रत्येक ग्रामपंचायतीला हाय-स्पीड इंटरनेट देण्याचं आश्वासन देण्यात आलंय.

## संविधान बदलावर मी डिबेट करायला तयार; चंद्रकांत पाटलांचा विरोधकांना थेट इशारा



**मुंबई :** देशात विरोधकांकडून भारतीय जनता पक्ष देशातील संविधान बदलण्याच्या तयारीत असल्याचं सांगितल जात आहे. याबाबत भाजप नेते तथा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना विचारलं असता ते म्हणाले की, निवडणुकीच्या काळात हा अतिशय आवडता आरोप आहे. संविधान कधीही बदलता येत नाही. त्यात दुरुस्ती करता येते. आत्ता पर्यत संविधानात १०६ वेळा दुरुस्ती झाली आहे. यातील बहुतांश दुरुस्ती या काँग्रेसच्या काळात झाल्या आहे. यात बरोबर होते की, चुकीचे हा विषय नाही. अलीकडे मोदीजी यांनी दोन दुरुस्त्या केल्या. दुरुस्ती म्हणजे जे नव्हत ते आणलं आहे. मोदीजी यांनी २६ नोव्हेंबर रोजी घटना दिवस म्हणून साजरा करायला सुरवात केली. विरोधकांकडून होत असलेले आरोप हे जुने झाले असून, मी यावर डिबेट करायला देखील तयार आहे, असे यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने पुण्यातील डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पाटील यांनी अभिवादन केलं यावेळी ते बोलत होते.

यावेळी पाटील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक उपकार आपल्यावर आहेत. संपूर्ण देशाला त्यांनी दिलेली घटना फार मोठी देणगी आहे. पुढचे हजार वर्ष घटनेचा मूळ भाव बदलावा लागणार नाही. जगामध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. बाबासाहेबांमुळेच मोदीजींसारखे चहा वाल्याच्या घरात जन्म घेणारे पंतप्रधान झाले असल्याचं मत पाटील यांनी व्यक्त केलं.

सलमान खान यांच्या घराबाहेर गोळीबार झाला आहे. यावर सुप्रिया सुळे यांनी सरकारवर जोरदार टिका केली आहे. यावर पाटील यांना विचारलं असता ते म्हणाले की, घटना घडलेली असेल तर ती चुकीचीच आहे. २०१४ पासून २४ पर्यत एकही जातीय दंगा देशात झाला नाही. एकही बॉम्बस्फोट या देशात झालेला नाही. सर्वसामान्य लोकांनाही कळतं आहे. जर गोळीबार झालं आहे तर पोलीस याचा तपास करतील. पायाखालची वाळू घसरली की, घोषणा दिल्या जातात. जेव्हा एनडीएने घोषणा दिली की आपकी बार तेव्हा काँग्रेसनेच घोषणा दिली ४०० पार म्हणून, फिर एक बार चारसो पार मोदी की गॅरेंटी असल्याचं यावेळी पाटील म्हणाले.

## अमोल कोल्हे यांचं कर्तव्य मलाच पार पाडावं लागतं,

### शिवाजीराव आढळरावांचा आरोप



पुणे : शिरुर मतदारसंघाच्या जनतेचा माझ्यावर विश्वास आहे. हडपसर मतदार संघातून कमीत कमी एक लाख मतांचा लीड मला मिळणार असल्याचा विश्वास शिरुरचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) उमेदवार आढळराव पाटील यांनी व्यक्त केलाय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्तानं पुण्यातील पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. यावेळी ते बोलत होते.

**अमोल कोल्हेंवर टीका** : जिल्ह्यातील अनेक भागात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. खासगी टँकरनं पाणी पुरवठा केला जातोय. याबाबत आढळराव पाटील यांना विचारलं असता ते म्हणाले की, ''गेल्या वर्षी पाऊस कमी झाल्यानं पाण्याची जास्त पाणीटंचाई निर्माण झालीय. आमच्या काही संस्था तसंच काही स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून टँकरनं पाणीपुरवठा केला जातोय. डॉ. अमोल कोल्हे यांनी जुन्नर तालुक्यातील कोपरे मांडव हे गाव दत्तक घेतलं होतं. त्या गावात आमच्या कार्यकर्त्यांनी स्वखर्चानं पाण्याचे टँकर सुरू केले आहेत. त्यांना स्वत:च काहीही दिसत नाही. स्वत:चा तालुक्यातील त्यांनी घेतलेल्या दत्तक गावात काही नाही. ते राज्याचं काय सांगत आहेत?'' असा प्रश्न त्यांनी उपस्थित करत अमोल कोल्हेंवर टीका केलीय.

कोल्हेंचं कर्तव्य मलाच पार पाडावं लागतंय : शिरुर मतदार संघाच्या प्रचाराच्या बाबतीत आढळराव पाटील यांना विचारलं असता ते म्हणाले की, ''जे प्रकल्प पाच वर्षापूर्वी होते, ते देखील आत्ता आहेत. त्याच परिस्थितीत आहेत. लोक सकाळपासून मला त्यांच्या अडीअडचणी सांगत असतात. तसंच मी खासदार नसताना देखील काम करत आहे.

## यांना इतक्या ताकदीनं पाडा की,

### मनोज जरांगेंचं मराठा समाजाला आवाहन; देवेंद्र फडणवीसांचा केला उल्लेख!

**मुंबई :** देशात आणि राज्यात सध्या लोकसभा निवडणुकांचा प्रचार सुरू झाला आहे. सर्वच पक्षांनी कंबर कसली असून सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या आघाड्यांनी एकमेकांवर जाहीर सभांमधून टीका-टिप्पणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर एकीकडे राजकीय पक्ष जागावाट, टीका-टिप्पणीत व्यग्र असताना दुसरीकडे मराठा आरक्षण व आंदोलनाच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेले मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला मोठं आवाहन केलं आहे. चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

**मनोज जरांगे पाटलांचा पुन्हा उपोषणाचा इशारा**

मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे. येत्या ४ जूनपर्यत अर्थात लोकसभा निवडणुकांचे निकाल लागेपर्यत जर सरकारनं मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेतला नाही, तर आपण पुन्हा उपोषण करू, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. त्याशिवाय, आम्ही विधानसभा निवडणुकीत उतरू आणि सरकारचा करेक्ट कार्यक्रम करू, असं विधानही त्यांनी केलं आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीतून माघार घेणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने तयारी असल्याचं नमूद केलं आहे.

**''देवेंद्र फडणवीसांना मराठ्यांविषयी खूपच प्रेम''**

यावेळी मनोज जरांगेंनी देवेंद्र फडणवीसांना खोचक शब्दांत टोला लगावला. ''देवेंद्र फडणवीसांना मराठ्यांविषयी खूपच प्रेम आहे. माता-माऊलींवर गोळ्या घालणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी बढती दिली आहे. पोलिसांच्या माध्यमातून चार महिन्यांपूर्वीचे गुन्हे अगदी कालपर्यंत दाखल करण्याचं काम चालू आहे. त्यामुळे ते गृहमंत्री म्हणून शाबासकी देण्यासारखे आहेत'', असं ते म्हणाले.

**मराठा समाजाला जरांगेंचं आवाहन**

''मराठा समाजानं एक लक्षात घ्यावं, पाडण्यातही मोठा विजय आहे. पाडा यांना. मराठ्यांनी १०० टक्के मतदान करावं. यांना इतक्या ताकदीनं पाडा की इथून पुढे यांना मराठ्यांच्या मतांची किंमत कळली पाहिजे. मराठ्यांच्या मतांची भीती वाटली पाहिजे. आता मराठा समाज यांचा राईट कार्यक्रम करेल. पाडण्यातही खूप मोठा विजय आहे. महायुतीनं आम्हाला फसवलं आहे. सरकारला आमच्या छातीत लागलेल्या गोळ्या दिसत नाहीयेत. समाजाला बरोबर कळलंय कुणाच्या विरोधात मतदान करायचंय. मराठे कुणाच्याही सभांना जात नाहीयेत. निकालाच्या दिवशी राईट कार्यक्रम होईल'', असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

**देवेंद्र फडणवीसांवर टीकास्त्र**

''मी अजूनही गृहमंत्र्यांना सांगतो. तुम्ही माझ्या नादाला लागू नका. मी निष्ठावान आहे. मी माझी जात विकू शकत नाही. तुम्ही माझ्या नादी लागू नका. मला तुम्ही आंदोलनात हलक्यात घेतलं होतं. मला राजकारणात हलक्यात घेऊ नका. मला तिकडे जायचं नाहीये. पण मला राजकारणात ओढायचा प्रयत्न केला, तर तुमचा कायमचा कार्यक्रम लागेल. दलित, मराठा, मुस्लीम, लिंगायत, बारा बलुतेदार असे सगळे आम्ही एकत्र येणार आहोत. यांनी दोन उपमुख्यमंत्री केले, आमचे सात होऊ द्यात. होऊ द्या सगळ्यांचे एकेक'', अशा शब्दांत मनोज जरांगे पाटलांनी विधानसभेसंदर्भात सूचक विधान केलं आहे.

## निवडणूक रोखे खरेदीत देशात दुसऱ्या क्रमांकावर असणारी मेघा इंजिनिअरिंग कंपनी CBI च्या रडारवर!

### गुन्हा दाखल

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनंतर एसबीआयनं निवडणूक रोख्यांसंदर्भातली सर्व माहिती जाहीर केली आहे. त्यात लॉटरी किंग सँतियागो मार्टिनच्या फ्युचर गेमिंग कंपनीनं सर्वाधिक १३६८ कोटींचे निवडणूक रोखे वेगवेगळ्या राजकीय पक्षांना दिल्याचं समोर आलं. पण त्याच यादीत दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या मेघा इंजिनिअरिंग या पायाभूत सुविधा उभारणी कंपनीनं तब्बल ९६६ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केल्याचं समोर आलं आहे. या कंपनीनं देशात विविध प्रकारचे पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण केले आहेत. आता ही कंपनी सीबीआयच्या रडारवर आली असून लाच प्रकरणात या कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सीबीआयनं हैदराबादमधील मैघा इंजिनिअरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (चएखड) विरोधात लाच प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. याशिवाय एनआयएसपी, एनएमडीसी आणि मिकॉनमधील दोन पदाधिकाऱ्यांवरही या प्रकरणात सीबीआयनं गुन्हा दाखल केला आहे. जगदलपूर स्टील प्लांटशी संबधित १७४ कोटींची बिलं मंजूर करण्यासाठी ७८ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप या अधिकाऱ्यांवर ठेवण्यात आला आहे.

कोण आहेत मेघा इंजिनिअरिंगचे प्रमोटर्स?

पमिरेड्डी पिची रेड्डी आणि पी. व्ही. कृष्णरेड्डी हे मेघा इंजिनिअरिंग इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे प्रमोटर्स आहेत. यासंदर्भात ३१ मार्च रोजी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार १० ऑगस्ट २०२३ रोजीच सीबीआयनं या प्रकरणाची प्राथमिक चौकशी सुरू केली होती. जगदलपूरमध्ये जवळपास ३१५ कोटी रुपयांचा स्टील प्लांट उभारण्यात आला असून त्यात कथितरीत्या गैरव्यवहार झाल्याचा दावा एनएमडीसी लिमिटेडच्या मुख्य दक्षता अधिकाऱ्यांनी केला होता. यानुसार त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर सीबीआयनं चौकशी सुरू केली होती.

कंपनीशी संबंधित व्यवहारांमध्ये फायदा मिळावा म्हणून मेघा इंजिनिअरिंगचे प्रकल्प विभागाचे संचालक सुभाष चंद्रा यांनी एनआयएसपीचे माजी कार्यकारी संचालक प्रशांत डॅश यांना लाच म्हणून मोठी रक्कम दिली, असा उल्लेख एफआयआरमध्ये असल्याचं वृत्त इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे.

सीबीआयनं दाखल गुन्ह्यामध्ये ८ अधिकाऱ्यांचा उल्लेख केला आहे. त्यात एनआयएसपी व एनएमडीसीच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यानुसार निवृत्त कार्यकारी संचालक प्रशांत डॅश, उत्पादन विभागाचे संचालक डी. के. मोहंती, डीजीएम पी. के. भुयान, डीएम नरेश बाबू, वरिष्ठ व्यवस्थापक सुब्रो बॅनर्जी, निवृत्त सीजीएम एल, कृष्ण मोहन, जीएम के. राजशेखर, व्यवस्थापक सोमनाथ घोष यांनी ७३ लाख ८५ हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप आहे, असाही उल्लेख एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

## इस्रायलवरील हल्ल्यानंतर भारताने जाहीर केली भूमिका

**तेहरान :** इराणने इस्रायलवर शेकडो क्षेपणास्त्र डागून जग पुन्हा एकदा अशांत केलं आहे. इस्रायलवरील हल्ल्याबाबत इराणने आधीच इशारा दिला होता. त्यानुसार, भारतासह अनेक देशांनी आपल्या नागरिकांना पश्चिम आशियायी देशांत जाण्यापासून रोखले होते. आता इराणने इस्रायलवर हल्ला केल्यानंतर भारताने आपली भूमिका जाहीर केली आहे. दोन्ही देशांना संयम राखण्याचे आवाहन करण्यात आले असून या देशातील भारतीय समुदायांच्या संपर्कात असल्याचं इस्रायलमधील परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी यासंदर्भात एक्सवर भारताच्या बाजूचं निवेदन सादर केलं आहे. ''इस्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या शत्रुत्वाबद्दल आम्ही गंभीरपणे चिंता व्यक्त करत आहोत. या प्रदेशातील शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे'', असं भारताने या निवेदनात म्हटलं आहे.

''आम्ही तात्काळ डी-एस्केलेशन, संयम बाळगणे, हिंसाचारापासून मागे हटणे आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गावर परत जाण्याचे आवाहन करतो. आम्ही सध्याच्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत. या प्रदेशातील आमचे दूतावास भारतीय समुदायाच्या संपर्कात आहेत. प्रदेशात सुरक्षा आणि स्थिरता राखणे अत्यावश्यक आहे'', असंही भारताने म्हटलं आहे.

**भारताने जारी केली होती सूचना**

इस्रायलने ११ दिवसांपूर्वी इराणच्या सिरीयातील दूतावासावर हल्ला केला होता. त्यानंतर या दोन देशांतील तणाव कमालीचा शिगेला पोहोचला असून पश्चिम आशियावर युद्धाचे ढग दाटले आहेत. त्यामुळे अमेरिकेसह काही देशांनी आपापल्या नागरिकांना इराण आणि इस्रायलचा प्रवास टाळण्याचा सल्ला दिला होका. भारतानेही शुक्रवारी मार्गदर्शक सूचना जारी करून भारतीयांना खबरदारीचा इशारा दिला. इराण आणि इस्रायलबरोबरच भारतीयांनी म्यानमारलाही जाणे टाळावे, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते. म्यानमारच्या सित्वे शहरातील सुरक्षाविषयक परिस्थिती अस्थिर असल्याने तेथील वाणिज्य दूतावासातील कर्मचाऱ्यांना यांगून शहरात हलवण्यात आले आहे. भारत म्यानमारमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले.

इस्रायल आणि इराणमध्ये राहणाऱ्या भारतीयांनी स्वत:च्या सुरक्षेबद्दल दक्षता घ्यावी आणि आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावे, असेही मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. सध्या इराण किंवा इस्रायलमध्ये राहणाऱ्या सर्वांनी तेथील भारतीय दूतावासांशी संपर्क साधून आपल्या नवाची नोंदणी करावी, असे आवाहनही परराष्ट्र मंत्रालयाने केले आहे.

## इराणचा इस्रायलवर पहिला थेट हल्ला; शेकडो क्षेपणास्त्रे, ३०० ड्रोन इस्त्रायलवर डागली



**तेल अवीव :** इस्त्रायल आणि पॅलेस्टीन युद्धाची दाहकता अजूनही शमली नसतानाच आता इराणने इस्रायली प्रदेशावर पहिल्यांदाच थेट हल्ल्यात शेकडो क्षेपणास्त्रे आणि ड्रोन लाँच केले आहेत. प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्यात सात वर्षांची मुलगी जखमी झाली असून इस्त्रायली लष्करी सुविधेचे किरकोळ नुकसान झालं आहे.

हल्ले रोखण्यात यश

शनिवारी रात्री उशिरा झालेल्या हल्ल्याने तेल अवीव आणि पश्चिम जेरुसलेमसह संपूर्ण इस्रायलमधील शहरांमध्ये हवाई हल्ल्याचे सायरन वाजले गेले. इस्रायली हवाई संरक्षणाने हल्ले रोखल्यानंतर स्फोटांचा आवाज झाला. इस्रायली सैन्याने सांगितले की इराणच्या सॅल्व्होमध्ये ३०० हून अधिक किलर ड्रोन, बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि क्रूझ क्षेपणास्त्रे आहेत. परंतु युनायटेड स्टेट्स आणि युनायटेड किंगडमच्या सैन्याच्या मदतीने ९९ टक्के रोखण्यात यश आलं आहे. हे ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले इराण, तसेच इराक आणि येमेनमधून आले होते, असेही त्यात म्हटले आहे.

वैद्यकांनी सांगितले की दक्षिण इस्रायलमधील एका मुलगी ड्रोनच्या छऱ्यांनी जखमी झाली आहे. सैन्याने म्हटले आहे की ''दक्षिण इस्रायलमधील (इस्त्रायली लष्करी) तळासह पायाभूत सुविधांचे किरकोळ नुकसान झाले आहे.

इराणकडून ''ट्रू प्रॉमिस'' ऑपरेशन

इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स कॉर्प (IRGC) ने हल्ल्याची पुष्टी केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार १ एप्रिल रोजी ''सीरियातील इराणी वाणिज्य दूतावासाला लक्ष्य करण्याच्या झिओनिस्ट घटकांच्या गुन्ह्यासाठी'' शिक्षेचा भाग म्हणून ''ट्रू प्रॉमिस'' ऑपरेशन अंतर्गत ड्रोन आणि क्षेपणास्त्रे सुरू करण्यात आली आहेत.

दमास्कसमधील हल्ल्यात खठक्ष्ठ च्या एलिट कुड्स फोर्समधील दोन वरिष्ठ जनरल्ससह १२ लोक ठार झाले होते.

इस्रायलने वाणिज्य दूतावास हल्ल्याची जबाबदारी घेतली नव्हती किंवा नाकारली सुद्धा नव्हती. दरम्यान, अमेरिकेला संघर्षापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. इस्त्रायलचे गाझावरील युद्धाचे सहा महिने झाले आहेत. त्यामुळे आखाती प्रदेशांमध्ये तणाव वाढवला आहे. हा वणवा आता लेबनॉन आणि सीरियासह आघाडीवर पसरला आहे.

इराणच्या हल्ल्यापूर्वी इराक, जॉर्डन आणि लेबनॉनने त्यांचे हवाई क्षेत्र तात्पुरते बंद करण्याची घोषणा केली, तर सीरियाने देखील दमास्कस आणि प्रमुख तळांभोवती रशियन-निर्मित पँटसिर जमिनीपासून हवाई संरक्षण प्रणालींना हाय अलर्ट दिला होता. याआधी शनिवारी इराणच्या सशस्त्र दलांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ इस्रायलशी निगडीत कंटेनर जहाज ताब्यात घेतले आहे.

## लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या युट्यूबर जोडप्याची अवघ्या पंचवीशीतच आत्महत्या

**हरियाणा :** हरियाणामध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या युट्यूबर जोडप्याने सातव्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली. हरियाणाच्या बहादुरगड भागात एका इमारतीत जोडपे राहत होते. हे जोडपे युट्यूब, फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर व्हिडिओ कंटेट तयार करत असत. तसेच लघूपटही तयार करत असत. नुकतेच देहरादूनहून ते आपल्या पाच जणांच्या टीमसह बहादुरगड येथे राहण्यास आले होते. येथील रुहील रेसिडेन्सीमध्ये ते सातव्या मजल्यावर भाड्याच्या घरात राहत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चित्रीकरण संपल्यानंतर काल (दि. १२ एप्रिल) रात्री उशीरा जोडपे घरी परतले. रात्री दोघांमध्ये काही कारणामुळे भांडण झाले, त्यानंतर सकाळी सहा वाजता त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले.

जोडप्याने इमारतीमधून उडी घेतल्याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह ताब्यात घेतले. तसेच दोघांच्याही कुटुंबाला याबद्दलची माहिती देण्यात आली आहे. न्यायवैद्यक शास्त्र तपासणी करणारे पथकही घटनास्थळी दाखल झाले असून सीसीटीव्ही चित्रण आणि इतर पुराव्यांची तपासणी केली गेली.

गारवित आणि नंदिनी दोघेही व्हिडिओ कंटेट तयार करण्यात सक्रिय होते. गारवितने काही चित्रपट आणि वेब सीरीजमध्ये काम केले होते. तर नंदिनीही चित्रपटसृष्टीत नशीब अजमावत होती. तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर काही सिने कलाकारांबरोबरची छायाचित्रे आहेत.

शनिवारी सकाळी दोघेही एकटेच घरी होते. सोसायटीतील रहिवाश्यांना त्यांचे मृतदेह आढळून आल्यानंतर त्यांच्या मित्रांना बोलाविण्यात आले.